ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधान:” इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष २५ | पुणें, बुधवार तारीख ४ मार्च, १९५९ | अंक ९

## विविध माहिती

**रेल्वेमार्गांचें विद्युतीकरण**—भारताच्या पूर्व भागांतील रेल्वे-मार्गांचें विद्युतीकरण करण्याच्या कामाला लवकरच जोराची चालना देण्यांत येणार आहे. १९५८–५९ च्या आर्थिक वर्षांत ह्या कामासाठी ८·२९ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली होती. १९५९-६० च्या आर्थिक वर्षांत २६·४७ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत येणार आहे.

**पाकिस्तानांत तेलाचा कारखाना**—पाकिस्तानांत बाहेरून अशुद्ध तेल आयात करून त्यापासून शुद्ध तेल तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्याच्या तांत्रिक व आर्थिक बाबींची पाकिस्तान सरकारशीं चर्चा करण्यासाठी इटालियन तज्ज्ञांचें एक मंडळ पाकिस्तानांत गेलें आहे. बर्मा ऑइल, शेल, स्टॅनव्हॅक व काल्टेक्स ह्या कंपन्याहि कारखान्यासंबंधीं औत्सुक्य दाखवीत आहेत.

**वाहतुकीसाठी सहकारी संस्था**—केरळ सरकारनें राज्यांतील रस्त्यांवरून वाहतूक करण्यासाठी एक सहकारी संस्था काढण्यास मंजुरी दिली आहे. ह्या संस्थेंत सुशिक्षित पण बेकार मोटार ड्रायव्हर्स, क्लीनर्स, यंत्रज्ञ, कारकून, इत्यादि लोकांना सभासद होतां येईल. प्रत्येक सभासदाला १,००० रुपयांचा भाग घ्यावा लागेल. संस्थेचें एकूण भाग भांडवल ४ लाख रुपयांचें राहील.

**संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया**—भारतामधील मोठ्या शहरांतून संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करून घेणाऱ्यांची संख्या वाढूं लागली आहे. १९५६ सालीं अशा प्रकारच्या ७,००० शस्त्रक्रिया करण्यांत आल्या. १९५८ सालीं जवळ जवळ दुप्पट लोकांनीं अशी शस्त्रक्रिया करून घेतली.

**छोट्या मोटारींचें उत्पादन**—अमेरिकेंतील जनरल मोटार्स, फोर्ड व क्रिसलर ह्या मोठ्या कंपन्या लवकरच छोट्या मोटारींचें उत्पादन करूं लागणार आहेत. युरोपमधील मोटारच्या कारखानदारांनीं अमेरिकेंत छोट्या मोटारी निर्यात करून १० टक्के बाजारपेठ काबीज केली आहे. गेल्या वर्षीं अमेरिकेंतील ग्राहकांनीं युरोपमधून आलेल्या ३,८०,००० मोटारी खरेदी केल्या, व त्यांची मागणी अजूनहि वाढतच आहे.

**कोयना धरणासाठी कर्ज**—कोयना धरणाचें काम पूर्ण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय बँकेनें कर्ज देण्याचा विचार करण्याचें कबूल केलें आहे,” अशी माहिती लोकसभेंत उपअर्थमंत्री श्री. भगत ह्यांनीं सांगितली. कर्जासंबंधींच्या वाटाघाटी अद्याप चालू व्हावयाच्या आहेत. किती कर्ज मिळेल तें ठरविण्यासंबंधींच आतां बोलणीं व्हावयाचीं आहेत.

**पाकिस्तानला दिलेली मदत**—अमेरिकेच्या अर्थखात्याचे उपचिटणीस श्री. डिलॉन ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, पाकिस्तानला अमेरिकेनें दिलेल्या आर्थिक मदतीचा उपयोग तेथील लोकांचें राहणीचें मान वाढविण्यासाठी योग्य प्रकारें करण्यांत आलेला नाहीं. ह्याला कारण, पाकिस्तान सरकारनें परिणामकारक असें आर्थिक धोरण आंखलेलें नाहीं.

**मद्रासमध्यें व्यापारी केंद्र**—युगोस्लाव्हिआ मद्रास शहरांत आपलें व्यापारी केंद्र स्थापन करणार आहे. भारताकडून कातडीं, कापड, खनिजें, वनस्पति तेलें, चहा, ताग, इत्यादि माल अधिक प्रमाणांत घेण्याचा विचार युगोस्लाव्ह सरकार करीत आहे. त्या देशांत पोलादाच्या कारखान्यांत वापरण्यासाठी आजहि बराच कोळसा निर्यात होत असतो.

**हत्तीच्या बालकाची देणगी**—अमेरिकेंतील चित्रवाणीचे एक तज्ज्ञ व हॉलीवूडचे मेयर मि. लिंकलेटर ह्यांना त्यांच्या भारतीय मित्रांनीं एका छोट्या हत्तीची देणगी दिली आहे. हे छोटे गजराज शेवटीं लॉस एंजलिस येथील प्राणिसंग्रहालयाचे रहिवासी बनतील. त्यांचा सर्व प्रवास विमानानें होणार आहे आणि न्यूयॉर्कमधील विमानतळावर उतरतांच चित्रवाणीवर त्यांचा कार्यक्रमहि ठेवला जाईल.

**खासदारांपायीं रेल्वेला फटका**—उत्तर प्रदेशांतील ८४ खासदार राज्यांतील विकास योजनांची पाहणी करण्यासाठी लखनौ येथून निघणार होते. पण त्यांतील ७० जणांनीं कोणतीहि आगाऊ सूचना न देतां एकदम दिल्लीला प्रयाण केलें. त्यांच्या प्रवासासाठी खास डबा, नौकरचाकर, प्रसिद्धिव्यवस्था इत्यादि तयारी करण्यांत आली होती. ती फुकट गेल्यामुळें रेल्वेला हजारों रुपयांचें नुकसान सोसावें लागलें.

**हिंदी क्रिकेटला मदत**—भारतामधील क्रिकेटच्या खेळाची सुधारणा करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें सालोसाल पुढीलप्रमाणें मदत दिल्याचें लोकसभेंत सांगण्यांत आलें. १९५६–५७ सालीं ८४ लाख, १९५७-५८ सालीं ५० लाख आणि १९५८-५९ सालीं आतांपर्यंत ६० लाख रुपये.

**तेलावर चालणारीं रेल्वे-एंजिनें**—तेलावर चालणारीं रेल्वे एंजिनें तयार करण्यासाठी जरूर ती तांत्रिक मदत परदेशांकडून मिळविण्याचे प्रयत्न भारतामधील सात यंत्रसामुग्रीचे कारखाने करीत आहेत. त्याचप्रमाणें विजेच्या साह्यानें चालणारीं एंजिनेंहि तयार करण्याचे प्रयत्न होत आहेत. मात्र ह्या एंजिनांतील विजेचें साहित्य तूर्त आयात करावें लागेल.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत मांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें मांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल मांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८५,५०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री म. व्यं. शिगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.



# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : १४८३.

## सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवीचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१–७–५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत मांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें मांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल मांडवल | रु. ४,००,१८५ |
| रिझर्व्हज् | रु. १,२५,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. ७७,००,०००चे वर

★ रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.

★ शॉर्टटर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.

★ मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स



सुरक्षित गुंतवणूक तथापि भरपूर मोबदला

# दि बेळगांव बँक लिमिटेड

(शेड्यूल्ड बँक)

मुख्य कचेरी : रविवार पेठ, बेळगांव

मुंबई व म्हैसूर राज्यांत एकूण २५ शाखा

आमच्या ठेवीदारांसहि योग्य मोबदला मिळावा म्हणून आम्ही ठेवींवरील व्याजाचे दर खालीलप्रमाणें वाढविले आहेत.

★ द. द. शें. ४ टक्के व्याजाच्या त्रैवार्षिक कॅशसर्टिफिकेटसची नवीन योजना—

★ मुदत ठेवी—

| | | | |
|---|---|---|---|
| ६ महिने | द. द. शें. | ३ | टक्के |
| १ वर्ष | ,, | ३। | ,, |
| २ वर्षें | ,, | ३॥ | ,, |
| ३ वर्षें | ,, | ३॥। | ,, |
| ४ वर्षें | ,, | ४ | ,, |

★ सेव्हिंग्ज खातें द. द. शें. २ टक्के
होम सेव्हिंग्ज खातें ,, २॥ ,,

★ आकर्षक मोबदल्याची मासिक समान हप्त्यांची क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट खातीं १, २, ३ व ४ वर्षांचे मुदतीनें स्वीकारलीं जातात.

— बँकेचें स्थैर्य व प्रगति दर्शविणारे आंकडे —

| | |
|---|---|
| वसूल मांडवल | रु. सहा लाख |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ,, सवातीन लाख |
| एकूण ठेवी | ,, एक कोटी, सत्तावीस लाख |

विशेष माहितीसाठीं आमच्या कोणत्याहि शाखेंत चौकशी करा.

गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.
एच्. एस्. कुलकर्णी, बी. ए., जनरल मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. ४ मार्च, १९५९



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## आर्थिक विकासासाठी परदेशांचें साह्य

पश्चिम जर्मनीच्या पार्लमेंटमधील विरोधी पक्षाचे दोन सभासद भारतामध्यें येऊन गेले. हे सभासद अर्थशास्त्रज्ञ आहेत. पश्चिम जर्मनीनें युद्धोत्तर कालांत अगदीं थोड्या अवधींत आपली आर्थिक घडी पुन्हां बसविलेली त्यांनीं पाहिलेली आहे. भारताच्या आर्थिक उद्धारासाठी करण्यांत येणाऱ्या प्रयत्नांचें त्यांनीं केलेलें मूल्यमापन अर्थातच सूचक मानण्यास हरकत नाहीं. भारतांत चाललेल्या विकासाच्या कामांपैकी कांहीं त्यांनीं नजरेखालीं घातल्यावर असें मत व्यक्त केलें कीं, आर्थिक विकासासाठी भारतांत करण्यांत येणारे प्रयत्न यशस्वी होणें केवळ भारताच्या दृष्टीनें जरूरीचें आहे असें नाहीं, तर जगांतील लोकशाहीच्या दृष्टीनेंहि ह्या प्रयत्नांना यश येणें फार अगत्याचें आहे. भारतामधील औद्योगिक विकासाचीं कामें इतकी प्रचंड स्वरूपाचीं व विविध प्रकारचीं आहेत कीं त्यांना लागणारा पैसा देशांतल्या देशांत गोळा होणें जवळ जवळ अशक्य आहे. म्हणून पश्चिम युरोपांतील विकसित देशांनीं भारताला दीर्घ मुदतीचीं कर्जे देण्याचे मार्ग शोधून काढले पाहिजेत. औद्योगिक विकासाच्या कार्यांत खाजगी भांडवलाचें साह्य घेणें जरूर आहे, असें भारत सरकारचें मत आहे. म्हणून पश्चिम जर्मनीचें सरकार व भारत सरकार ह्यांनीं उभयता देशांतील खाजगी भांडवलाचें अधिकाधिक सहकार्य घडवून आणण्यास उत्तेजन दिलें पाहिजे. हल्ली होत आहे त्यापेक्षा अधिक मोठ्या प्रमाणावर असें सहकार्य घडवून आणणें शक्य आहे. त्याचबरोबर, भारतानें आपली निर्यात वाढविण्याचे खास प्रयत्न करणें आवश्यक आहे. युरोपमधील लोकांना भारताच्या मालाची ओळख करून दिली गेली पाहिजे. फ्रँकफर्ट येथें लवकरच स्थापन करण्यांत येणारें 'इंडिआ हौस' ह्या दृष्टीनें उपयुक्त कार्य करूं शकेल.

## औद्योगीकरणासाठी ब्रिटनची मदत

ब्रिटनमधील एक प्रसिद्ध उद्योगपति व एंजिनिअर मि. नेल्सन ह्यांनीं मुंबई येथें बोलतांना असे उद्गार काढले कीं, भारताच्या औद्योगीकरणाला ब्रिटनकडून अजूनहि महत्त्वाची मदत मिळूं शकेल. ते पुढें म्हणाले कीं, ह्या दोन देशांचे संबंध पूर्वापार चालत आलेले आहेत आणि उभयता देशांमध्यें सद्भावहि वसत आहे. ह्या बाबतींत एक गोष्ट मुद्दाम लक्षांत ठेवली पाहिजे. ब्रिटननें गेल्या शतकांत यंत्रयुगाला प्रारंभ केला आणि आज तें अणुयुगापर्यंत पोंचलें आहे. ह्या दीर्घ कालखंडांत ब्रिटनमधील लोकांना औद्योगीकरणाविषयीं भरपूर अनुभव आलेला आहे. बापापासून मुलाला आधुनिक उद्योगधंद्यांचें ज्ञान मिळून ब्रिटनमध्यें अशा पांच पिढ्या तयार झाल्या. आज जीं राष्ट्रें उद्योगधंद्यांच्या बाबतींत अप्रगत आहेत त्यांना इतका कालावधि मिळणार नाहीं. त्यांना आधुनिक यंत्रविज्ञान हस्तगत करण्यासाठी २५-३० वर्षांपेक्षा अधिक काळ मिळणार नाहीं. भारतामधील लोकांचें राहणीचें मान वाढावें म्हणून जे प्रयत्न करण्यांत येत आहेत त्यांचें पाश्चिमात्य जगांत स्वागतच करण्यांत येत आहे. कारण अधिक संपत्ति निर्माण झाल्यावर परस्परांमधील व्यापारी देवघेवहि वाढेल. गेल्या दहा वर्षांत भारतानें बरीच प्रगति केलेली आहे. ही प्रगति अशीच चालू राहण्यासाठी भारतांत कुशल तंत्रज्ञ शिकवून तयार करणें अतिशय अगत्याचें आहे. ऑस्ट्रेलिआ अगर कॅनडा ह्या देशांचें औद्योगीकरण होत असतांना अशा प्रकारच्या कुशल तंत्रज्ञांचा पुरवठा युरोपमधून होत गेला. पण लोकसंख्येची अशा प्रकारची हालचाल भारताच्या बाबतींत शक्य होणार नाहीं. मोठ्या प्रमाणावरील प्रचंड कारखाने सार्वजनिक मालकीचे असण्यास हरकत नाहीं. पण, खाजगी मालकीच्या छोट्या उद्योगधंद्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं.

## औषधांच्या बाबतींतील स्वयंपूर्णता जवळ आली

भारत स्वतंत्र होण्यापूर्वी इतर अनेक बाबींप्रमाणें औषधांच्या बाबतींतहि तो परदेशांवर अवलंबून होता. औषधें अथवा तीं तयार करण्यासाठी लागणारें साहित्य परदेशांतून आयात करावें लागत असे. पण, स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतरच्या काळांत ही परिस्थिति पालटूं लागली आणि औषधें तयार करण्याच्या बाबतींत चांगली प्रगति करण्यांत आली. ह्या कामीं जागतिक आरोग्य संघटना आणि परदेशांतील औषधांचे कांहीं कारखानदार ह्यांची भारताला बहुमोल मदत झालेली आहे. गेल्या दोन वर्षांत तर औषधें व त्यासाठी लागणारें साहित्य ह्यांची निर्मिति दुपटीनें वाढलेली आहे. १९५५-५६ सालीं भारतांत ३२ कोटी रुपये किंमतीचीं औषधें तयार करण्यांत आलीं. गेल्या वर्षीं जवळ जवळ ६२ कोटी रुपयांचीं औषधें तयार करण्यांत आलीं. ह्यावरून प्रगतीचा वेग लक्षांत येईल. भारताचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं अशी अपेक्षा व्यक्त केली आहे कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भारत औषधांच्या बाबतींत स्वयंपूर्ण होऊं शकेल. कार्यक्रमाच्या अखेरीस भारतांत दरसाल १५० कोटी रुपयांचीं औषधें तयार होतील असा त्यांचा अंदाज आहे. तथापि ह्या बाबतींत एक महत्त्वाचा मुद्दा लक्षांत घ्यावयाला पाहिजे. औषधें तयार करण्यासाठी जें मूलभूत साहित्य लागतें तें देशांतील मालमसाला वापरून तयार करतां येईल तेव्हांच हवी असलेली स्वयंपूर्णता १०० टक्के खरी होईल. त्याचप्रमाणें औषधांच्या कारखान्यासाठी लागणारा तंत्रज्ञांचा वर्गहि शिकवून तयार करण्यांत आला पाहिजे. मालाचा दर्जा चांगला राखण्यासाठी उत्पादनाच्या अनेक पातळींवर त्याची चांचणी करण्याचीहि व्यवस्था झाली पाहिजे. मोठे कारखानदार अशी दक्षता आपल्या नांवाकरतां घेतात. पण छोटे धंदेवाले इतकी काळजी घेत नाहींत.

**ओरिसा सरकारचे नवे कर**—ओरिसा सरकारनें राज्यांतून बाहेर निर्यात होणाऱ्या बांबूवर आणि तागावर कर बसविण्याचें ठरविलें आहे. बांबू संबळपूरच्या कागदकारखान्याकडे व ताग कलकत्त्यामधील गिरण्यांकडे पाठविला जातो. नव्या करामुळें ओरिसा सरकारला २४ लाख रुपयांचें उत्पन्न होईल.

## रेल्वे खात्याचा वार्षिक अहवाल

रेल्वे खात्याचा १९५७–५८ चा वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला आहे

गेल्या वर्षाशीं तुलना करतां सदर वर्षांत माल वाहतुकींत ६·३७ टक्के तर उतारू वाहतुकींत ३·५१ टक्के वाढ झाली आहे.

या वर्षांत एकूण १३३ दशलक्ष टन मालाची वाहतूक झाली. गतवर्षीचा हा आंकडा १२५ दशलक्ष टन होता. टन मैल वाहतुकीचा विचार करतां या वर्षांत ४४,८९७ दशलक्ष टन मैलांची वाहतूक झाली. गतवर्षीचा हा आंकडा ४०,२५५ दशलक्ष टन मैल असा होता.

तसेंच सदर वर्षांत उतारूवाहतुकीचें प्रमाण १९५६–५७ मधील १३८२ दशलक्षांवरून या वर्षांत १४३१ दशलक्षांवर (सरकारी रेल्वेकडून १४१० दशलक्ष) तर उतारू मैलांचें प्रमाण ४२,१९५ दशलक्षांवरून ४३,३३३ दशलक्षांवर गेलें.

### अधिक वाघिणी माल भरला

अहवालाच्या या वर्षांत दररोज ब्रॉड गेजवर १२,६८३ व मीटर गेजवर ८३५४ वाघिणी माल भरण्यांत आला. गतवर्षीचे हेच आंकडे अनुक्रमें १२,१६८ व ७८१९ असे होते. यावरून या वर्षांत वाघिणी भरण्याचें प्रमाण ब्रॉड गेजवर ४·२३ टक्क्यांनीं व मीटर गेजवर ६·८४ टक्क्यांनीं वाढल्याचें दिसून येतें. या आंकड्यांत रेल्वेच्या कामासाठीं भरलेल्या वाघिणींचा समावेश होत नाहीं.

या वर्षांत सरकारी रेल्वेस उतारूवाहतुकीपासून ११९·१० कोटी रु., मालवाहतुकीपासून २२९·६८ कोटी रु. व पार्सलें, सामानवाहतूक व उत्पन्नाच्या संकीर्ण बाबींतून ३१ कोटी रु. मिळून एकूण ३७९·७८ कोटी रु. उत्पन्न आलें.

रेल्वेच्या नेहमींच्या कामकाजावर या वर्षांत २६४·१८ कोटी रु. खर्च झाला. घसारा राखीव निधीसाठीं ४६·२३ कोटी रु. देण्यांत आले. पैकीं चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्स व इंटिग्रल कोच फॅक्टरीसाठीं १·२३ कोटी रु. देण्यांत आले.

### खास कारणांमुळें कामकाजावरील खर्चांत वाढ

रेल्वे नोकरवर्गास दरवर्षी होणारी पगारवाढ, नोकरवर्गाच्या संख्येंतील वाढ, वाढत्या वाहतुकीसाठीं लागलेला जादा कोळसा, किंमतीमानांत विशेषतः कोळशाच्या किंमतींत झालेली वाढ, दुरुस्ती इत्यादि कामांवरील खर्चांत वाढ इत्यादि कारणांमुळें रेल्वेच्या नेहमींच्या कामकाजावरील खर्चांत या वर्षांत वाढ झाली आहे.

त्याचप्रमाणें दर महिन्यास ३०० रु. पर्यंत पगार असलेल्या नोकरांच्या महागाई भत्त्यांत जुलै १९५७ पासून ५ रु. झालेली वाढ, शक्य तों अपघात टाळण्यासाठीं योजिलेले सुरक्षिततेचे खास उपाय इत्यादींमुळेंहि या खर्चांत वाढ झाली आहे.

घसारा राखीव निधीसाठीं दिलेल्या ४५ कोटी रु. सुद्धां खर्च-वेंच जातां रेल्वे खात्यास या वर्षांत ५७·७८ कोटी रु. निव्वळ उत्पन्न आलें. पैकीं ४४·४० कोटी रु. सर्वसाधारण महसुलासाठीं देण्यांत आले, अशा रीतीनें या वर्षांत सदर खात्याकडे निव्वळ शिल्लकीदाखल १३·३८ कोटी रु. राहिले.

### वाहतूक–कार्यक्षमतेंत सुधारणा

या वर्षांत उतारूगाडी मैलांत २·२६ टक्के, मालगाडी मैलांत ५·०८ टक्के, दर दिवशीं वाघिणीमागें निव्वळ टन मैलांच्या निर्देशांकांत ब्रॉड गेजवर २·८१ टक्के व मीटर गेजवर ७·१४ टक्के वाढ झाल्यानें वाघिणी भरणें, त्यांचा अधिक चांगल्या प्रकारें वापर करणें व अधिक वाघिणी उपलब्ध करणें इ. गोष्टी शक्य झाल्या. त्याचप्रमाणें मेल गाड्या व महत्त्वाच्या उतारूगाड्यांच्या वक्तशीरपणांतहि या वर्षांत अधिक सुधारणा झाली.

### रेल्वे–सामुग्रीच्या बाबतींत स्वयंपूर्णता

सदर वर्षांत रेल्वे डबे, वाघिणी, इंजिनें या बाबतींत स्वयंपूर्णता गांठण्याच्या दिशेनें आणखी प्रगति झाली. चित्तरंजन रेल्वे इंजिन कारखान्यानें १६४ डब्ल्यूजी रेल्वे इंजिनें तयार केलीं. पेरांबूर येथील रेल्वे डब्यांच्या कारखान्यांत सदर वर्षांत २२२ डबे तयार झाले. त्याचप्रमाणें देशांतील वाघिणी तयार करणाऱ्या कारखान्यांनींहि वाघिणींच्या उत्पादनांत बरीच प्रगति केली आहे. १९५७–५८ मध्यें वापरांत आणलेल्या एकूण २९,६३४ वाघिणींपैकीं १७,२१६ वाघिणी देशांत तयार झालेल्या होत्या. त्याचप्रमाणें एकूण १,४०६ डब्यांपैकीं अवघे १६४ डबे आयात करण्यांत आलेले होते. यांत्रिक संदेश-वाहनाची बरीचशी सामुग्री आतां देशांतच तयार होत असते आणि अलिकडील कांहीं महिन्यांत या धंद्यानें उत्पादन जवळ जवळ दुपटीनें वाढविलें आहे. त्याचबरोबर विद्युत्संदेशवाहन सामुग्रीचेंहि उत्पादन वाढविण्यासाठीं योजना तयार केलेल्या आहेत. रेल्वेचे रूळ, ओतीव लोखंडी स्लीपर, गार्डीतील दिवे, इंजिनावरील मोठे दिवे, डायनामो इ. स्वरूपाची प्रकाशसामुग्री, यांसारख्या कांहीं वस्तूंचें देशांत उत्पादन करण्याबाबत उपाय योजलेले आहेत.

### नवे मार्ग आणि बांधकामें

सदर वर्षांत एकूण १६८ मैल लांबीचे नवे रेल्वे मार्ग वाहतुकीसाठीं खुले करण्यांत आले आणि पूर्व रेल्वेच्या हावडा डिव्हिजनवरील हावडा ते बांडेल व शेवराफुली ते तारकेश्वर या ४६ मैलांच्या भागाचें विद्युतीकरणाचें काम पुरें करण्यांत आलें आणि या विभागावर विजेवर चालणाऱ्या उपनगर गाड्या सुरू करण्यांत आल्या. इतर निरनिराळ्या रेल्वेमार्गावरील सुमारें ५५५ मैलांच्या भागांत बांधणीकाम प्रगतिपथावर आहे. तसेंच निरनिराळ्या रेल्वेवरील अनेक यार्डांच्या नूतनीकरणाचें काम कोठें पुरें झालें आहे तर कोठें चालू आहे. तसेंच सदर वर्षांत एकूण १६७ मैल लांबीच्या मार्गाचें दुहेरीकरण करण्यास मंजुरी दिलेली आहे. त्याचप्रमाणें एकूण २४७८ मैल मार्गाचें नूतनीकरण करण्यांत आलें. संदेशवहनाचा दर्जा सुधारण्याबाबतहि या वर्षांत बरीच प्रगति साधण्यांत आली.

सदर वर्षांत रेल्वेवर एकूण १४०८ नवे डबे चालू करण्यांत आले. त्यांपैकीं १०९१ डबे खालच्या वर्गाचे होते व ते सुधारलेल्या नमुन्यानुसार बांधलेले आहेत. याशिवाय तिसऱ्या वर्गाच्या ११०१ डब्यांत पंखे बसविण्यांत आले.

### एकूण भांडवल–गुंतवणूक

सर्व रेल्वेवर गुंतविलेलें एकूण भांडवल ३१ मार्च १९५८ रोजीं १४४१·५२ कोटी रु. होतें. त्यांत बांधणी चालू असलेल्या रेल्वे-मार्गाच्या भांडवलाचाहि अंतर्भाव होतो. या एकूण रकमेपैकीं १४३५·३२ कोटी रु. निरनिराळ्या खात्यांतून घेऊन सरकारी रेल्वेवर गुंतविलेले आहेत.

भारतांत सदर वर्षाचे अखेरीस एकूण रेल्वे मार्ग ३४८८९

मैलांचे होते. त्यापैकी २४४६२ मैलांचे मार्ग सरकारी व्यवस्थेखाली होते.

## रेल्वे–सामुग्रीची खरेदी

सन १९५७–५८ मध्यें रेल्वेंनीं एकूण २२१ कोटी रु. किंमतीची सामुग्री खरेदी केली. १९५६–५७ मधील १७१ कोटी रुपयांशीं तुलना करतां सदर वर्षांत २९ टक्क्यांनीं किंवा ५० कोटी रुपयांनीं त्यांत वाढ झाली. त्यापैकी देशी सामुग्रीवर १५८·४८ कोटी रु., खादीवर ६२ लक्ष रु. व कुटीरोद्योगी व छोट्या उद्योगधंद्यांतील वस्तूंवर ३·५८ कोटी रु. खर्च करण्यांत आले. सदर वर्षांत रेल्वेंनीं एकूण २९२·०४ कोटी रु. किंमतीच्या सामुग्रीच्या मागण्या नोंदविल्या.

## रेल्वेचा नोकरवर्ग

भारतांत रेल्वे खात्यांत नोकऱ्यांच्या सर्वांत अधिक संधि उपलब्ध होत असून, ३१ मार्च १९५८ चे अखेरीस सरकारी रेल्वेंत एकूण ११,११,०२६ नोकर होते. मार्च १९५७ चा हाच आंकडा, १०,५६,६९२ (दुरुस्त) होता.

पगार, भत्ते, प्रॉव्हिडंड फंड व ग्रॅच्युइटी फंडासाठी दिलेली रक्कम मिळून १९५७–५८ मध्यें एकूण १७२·९४ कोटी रु. सरकारी रेल्वेच्या नोकरवर्गास देण्यांत आले. त्यामागील वर्षाचा हाच आंकडा १५६·३२ कोटी (दुरुस्त) होता.

---

## राजस्थान समृद्ध करणारा कालवा

राजस्थानमधील पाण्याची टंचाई प्रसिद्धच आहे. अर्थात् पाण्याच्या टंचाईमुळें चांगलें पीक काढतां येण्यासारखी हजारों एकर जमीन ओसाड पडून आहे. राजस्थानच्या खेड्यांतील लोक पावसाळ्याचें पाणी सांठवून ठेवतात. विहिरीला पाणी लागलें तर ते किमान २५० फूट खोल खणल्याशिवाय लागत नाहीं. आणि तेंहि अपुरें असतें; कधीं कधीं विषारीहि असतें. पण ह्या परिस्थितींत बदल घडवून आणण्याचें काम राजस्थानमध्यें काढण्यांत येत असलेल्या नव्या कालव्यामुळें होणार आहे. हा कालवा जगांतील सर्वांत मोठा म्हणजे ४२५ मैल लांबीचा होईल. सतलज व बिआस ह्या नद्या पंजाबांत जेथें मिळतात त्या ठिकाणाहून कालव्यांत पाणी सोडण्यांत येणार आहे. भारत व पाकिस्तानच्या पश्चिमेकडील सरहद्दींतल्या दिशेनें तो काढण्यांत येत आहे. सध्या ह्या भागांत धनगरांच्या फिरत्या शेळ्याच काय त्या वावरत असतात. ह्या कालव्याच्या रूपानें एक मोठी कृत्रिम नदीच राजस्थानांत अवतीर्ण होणार आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. बिकानेर–जसलमीर भागांतील ८,००० चौरस मैलांच्या कोरड्या ठणठणीत भागाला कालव्याच्या योगानें हुकमी पाणीपुरवठा होईल आणि भारतामध्यें धनधान्यसमृद्ध अशा प्रकारचा एक मोठा भूभाग नव्यानेंच निर्माण होईल. कालव्याच्या पहिल्या १३२ मैलांचें काम सुरू करण्यांत आलें आहे. त्यापैकी ११० मैल कालवा पंजाबांत असून २२ मैल राजस्थानांत आहे. कालव्याची खोली २१ फूट राहणार असल्यानें केवळ शेतीला पाणीपुरवठा करणारा म्हणूनच त्याचें महत्त्व नाहीं, तर जलमार्ग म्हणूनहि त्याचा उपयोग होणार आहे. कालव्याची योजना पूर्ण करण्यासाठी ६६ कोटी रु. लागणार आहेत. सुमारें २६ लाख एकर जमीन त्यामुळें पाण्याखालीं येईल.

**संततिप्रतिबंधक औषधें**—कलकत्ता येथील जंतु-संशोधन संस्थेनें, तोंडानें घेतां येण्यासारखें एक संततिप्रतिबंधक औषध १० वर्षांच्या खटपटीनंतर शोधून काढलें आहे. तें लवकरच बाजारांत येईल. त्याची किंमत अॅस्पिरिनच्या गोळीएवढी असून तें स्त्रियांना व पुरुषांना दोघांनाहि घेतां येईल. स्त्रियांवर औषधाचा प्रयोग यशस्वी झाला आहे.

**आयुर्विमा कॉर्पोरेशनचें काम**—आयुर्विमा कॉर्पोरेशननें १९५८ सालीं ३१३ कोटी रुपयांच्या दर्शनी किंमतीचीं नवीं विमापत्रकें दिलीं अशी माहिती लोकसभेंत उपअर्थमंत्री श्रीमती तारकेश्वरी सिन्हा ह्यांनीं सांगितली. १९५७ सालीं आयुर्विमा कॉर्पोरेशननें २८१ कोटी रुपयांचीं नवीं विमापत्रकें दिलीं होतीं. धंद्याचें राष्ट्रीयीकरण झाल्यानंतरचा हा उच्चांक आहे.

---

## बँक ऑफ कराडची तासगांव शाखा

दि बँक ऑफ कराड लि. ची तासगांव (द. सातारा) येथें दि. ११ फेब्रुवारीपासून शाखा उघडण्यांत आली आहे.

---



# नोटीस

## "दि बँक ऑफ कराड, लि., कराड."

बँकेच्या भागीदारांची तेरावी वार्षिक साधारण सभा सोमवार दिनांक २३ मार्च १९५९ रोजीं दुपारीं ४ वाजतां कराड येथें बँकेच्या ऑफिसांत भरणार आहे. सदर वेळीं बँकेच्या सभासदांनीं अगत्य येणेंचें करावें, अशी विनंती आहे.

सदर सभेमध्यें सभासदांना पाठविलेल्या नोटीसीमध्यें नमूद असलेलीं कामें केलीं जातील.

कराड,<br>ता. २८।२।१९५९

म. वि. खंडकर,<br>मॅनेजर.

# NOTICE

## Bhor State Bank Limited, Bhor

Notice is hereby given that the 15th Ordinary General Meeting of the Share-holders of Bhor State Bank, Ltd., will be held at the registered office of the Bank, at Rajwada Chowk, Bhor (Dist. Poona) at 1 p. m. (S. T.) on Monday the 30th March 1959 to transact the following business :–

(1) To receive and consider the Balance Sheet, Profit and Loss Account and the report of the Directors and Auditors for the year ended on 31st December 1958.

(2) To elect Directors in place of the retiring Directors who are eligible for re-election.

(3) To appoint Auditors for the current year and to fix their remuneration.

(4) To transact such other business as may be allowed by the Chairman.

Poona<br>2nd March 1959

By Order of the Board<br>Y. S. Joshi.<br>*Manager.*

*N. B.*—(i) The Share transfer books of the Bank will be closed from 23-3-59 to 11-4-59 (both days inclusive).

(ii) Member entitled to attend and vote is entitled to appoint proxy to attend and vote instead of himself and a proxy need not be a member of the Company.

## होळ नं. २ विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि.

### १९४६ ते १९५९ अखेरचा संक्षिप्त अहवाल

दिनांक ३०–७–१९४६ ला सोसायटी रजिस्टर केली गेली, त्यावेळीं सभासदसंख्या १३ होती, त्यामध्यें वाढ होऊन आज संस्थेचे ९२ सभासद आहेत.

सन १९५४ पर्यंत सभासदांना त्यांचे शेतीचे धंद्याकरितां भांडवल पुरविणें हेंच काम प्रमुखत्वें सोसायटीनें केलेलें आहे. यापेक्षा शेतकरी बंधूंच्या इतर शेतीपयोगी गरजा भागवितां आल्या तर बरे होईल हा दृष्टिकोन समोर ठेवून सन १९५४ मध्यें सोसायटीनें आपले पोटनियमांत दुरुस्ती करून घेतली व त्यामुळें क्रेडिट सोसायटीचें विविध कार्यकारी सहकारी सोसायटीमध्यें रूपांतर झालें.

सोसायटीचें कार्यक्षेत्र होळ गांवापुरतेंच मर्यादित होतें, परंतु पोटनियमांतील वरील बदलामुळें कार्यक्षेत्रामध्यें वाढ होवून तें होळ गांवापासून ५ मैल पर्यंत असें झालें आहे.

सोसायटीचे शेअर भांडवलांत हळू हळू वाढ होऊन तें आज रु. ५३,५८० झालें आहे. मुंबई राज्य सरकारनें सोसायटीचे शेअर भांडवलांत १० हजार रु. गुंतविले आहेत. म्हणजेच, आज रोजीं सोसायटीचें एकूण शेअर भांडवल रु. ६३५८० झालें आहे. तसेंच रु. ८,००० चे एकूण इतर फंड आहेत. या शिवाय नियोजित सहकारी साखर कारखान्याचे सुमारें रु. ४० हजारचे शेअर्स सोसायटीचे सभासदांनीं भरलेले आहेत.

सभासदांच्या गरजा जाणून सोसायटी निरनिराळे धंदे वेळोवेळीं हातीं घेत आली आहे. पेंड, सल्फेट, युरीया, सुपर फॉस्फेट, मॅन्युअर मिक्श्चर, मासळी वगैरे खतें, कीटकनाशकें व गुळ शुद्ध करण्याचीं साधनें वगैरे शेतीउपयोगी माल सोसायटी आज सभासदांना व इतर शेतकरी बंधूंना पुरवीत आहे. सन १९५६ पासून सोसायटीनें एक स्वस्त धान्याचें दुकान चालविलें आहे व तें आजहि चालू आहे.

सुगीचे दिवसांत व बाजारांतील मंदीचे वेळीं शेती मालाचा स्टॉक करून त्यावर शेतकऱ्यांना ॲडव्हान्स रूपानें धंद्याकरितां भांडवल पुरविणें हीं एक प्रमुख गरज ध्यानीं घेऊन त्याकरितां सोसायटीनें एक अद्यावत पद्धतीचें गोडाऊन बांधलें आहे. या कामाकरितां सोसायटीस मुंबई राज्य सरकारनें रु. १०,१२५ कर्ज व रु. ३,३७५ सबसिडी दिलेली आहे.

शेतकऱ्यांचे शेती मालाचे विक्रीची सोय सोसायटी शक्य तो लवकरच करणार आहे. या वरील व्यवहाराकरितां सोसायटीस एका डिझेल मालट्रकची आवश्यकता आहे, परंतु ही मालट्रकची गरज बँकेचे सहकार्याचे अभावी अद्याप पूर्ण झालेली नाहीं.

सोसायटीस सुरवातीचीं १० वर्षें म्हणजेच सन १९५६ पर्यंत नफ्याची वांटणी करतां आली नाहीं. सन १९५७ व सन १९५८ मध्यें सोसायटीनें खालीलप्रमाणें रु. १२,९६७–५९ नफा वांटलेला आहे.

| | रु. न. पै. |
|---|---|
| (१) रिझर्व फंड | ४,९२६–०० |
| (२) स्पेशल इमर्जन्सी रिझर्व फंड | ६२५–०० |
| (३) संशयित बुडीत कर्ज फंड | ६५१–०० |
| (४) इमारत फंड | २,१५१–०० |
| (५) सभासद डिव्हिडंड तरतूद फंड | ४,०००–०० |
| (६) इतर फंडस् | ६१४–५९ |
| एकूण रु. | १२,९६७–५९ |

सभासद डिव्हिडंड तरतूद फंडांतून सन १९५७ करितां ४ टक्के व सन १९५८ करितां ३½ टक्के प्रमाणें सभासदांना डिव्हिडंड सोसायटीनें वांटलें आहे.

संस्थेस सतत गेलीं १० वर्षें आपला ऑडिट वर्ग 'अ' हा टिकविणें शक्य झालें आहे व तो ऑडिट वर्ग आजहि कायम आहे. सोसायटीचे कार्यकारी मंडळांत प्रारंभापासून आतांपर्यंत बदल झालेला नाहीं, हें त्याचें वैशिष्ट्य आहे. श्री. बबुराव बळवंतराव धुमाळ हे सोसायटीचे चेअरमन असून श्री चंदुलाल गुलाबचंद शहा हे सेक्रेटरी आहेत.

## होळ (ता. बारामती) तेथील आधुनिक पद्धतीचें गोडाऊन

होळ नं. २ विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. या सोसायटीनें मौजे होळ ता. बारामती या गांवीं सरकारी योजनेप्रमाणें एक आधुनिक पद्धतीचें गोडाऊन बांधलें आहे. त्याचें उद्घाटन मे. डॉ ए. यू. शेख साहेब, रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्ह सोसायटीज, मुंबई राज्य यांचे शुभ हस्तें रविवार दिनांक २२–२–१९५९ या दिवशीं झालें.

त्यापूर्वी सौ. शेख ह्यांनीं कळाला कुंकू लावून विधीपूर्वक मंत्र म्हणून गोडाउनच्या वस्तूचें पूजन केलें.

त्यानिमित सदर सोसायटीनें दि. २१ व २२–२–५९ रोजीं व्हॉलीबॉल व हुतूतू या खेळांचे सामने ठेवले होते. सदर सामन्यांचें उद्घाटन श्री. मुगुटराव साहेबराव काकडे देशमुख, चेअरमन पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि. पुणें, यांचे हस्तें दिनांक २१–२–५९ रोजीं झाले. त्या सामन्यांतून भाग घेण्याकरितां दक्षिण सातारा, उत्तर सातारा, पुणें व सोलापूर या जिल्ह्यांतील खेळाडू आले होते. सदर सामन्यांमध्यें खालील प्रमाणें संघ विजयी झाले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. व्हॉलीबॉल : | विजयी : जॉली मोहन क्लब, इस्लामपूर | बक्षिस रु. | १०१ |
| ,, | उपविजयी : शिवछत्रपती व्यायाम मंडळ, उंब्रज | ,, रु. | ५१ |
| २. हुतूतू ओपन : | विजयी : वीर अभिमन्यू मंडळ, सातारा | ,, रु. | १०१ |
| ,, | उपविजयी : लोखंडे तालीम संघ, पुणें | ,, रु. | २५ |
| ३. हुतूतू ११० पौंड : | विजयी : लोखंडे तालीम संघ, पुणें | ,, रु. | ५१ |
| ,, | उपविजयी : साखरवाडी हुतूतू संघ | ,, रु. | २५ |

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## वार्तेत गहाळ झालेल्या चेकमुळें होणारी फसवणूक टाळण्याची योजना

### सुपरिंटेंडेंट ऑफ पोलिस ( गुन्हे शाखा ) ह्यांनीं बँकर्सना पाठविलेल्या सूचना

( १ ) प्रत्येक बेअरर चेकचा खराखोटेपणा पहाण्यासाठी 'अल्ट्रा व्हायोलेट रेज् लँप'चा उपयोग करा.

( २ ) खातें उघडण्यापूर्वी, खातेदार व त्याची ओळख सांगणारा, ह्यांचेविषयीं तपासणी करा. खातें उघडण्याच्या वेळीं ओळख सांगणारा बँकेंत समक्ष आला पाहिजे असा आग्रह धरा. खोट्या नांवानें खातें उघडलें जाण्याचा संभव त्यामुळें उरणार नाहीं.

( ३ ) खातें उघडणाऱ्या व्यक्ती व फर्म्स ह्यांच्या नजरेस खातेदारांना दिलेल्या सूचना आणाव्यात; शक्य तर ह्या सूचना नियमांत समाविष्ट कराव्यात.

( ४ ) फसव्या लोकांनीं क्रॉसिंगच्या रेघा खाडून टाकूं नयेत, ह्यासाठीं भोकें पाडून रेघा उमटाव्या किंवा एम्बॉस कराव्या.

( ५ ) ज्या नव्या खात्यांत मोठ्या रकमांचे चेक व ड्राफ्ट भरले जातात व त्यांच्या रकमा तात्काळ काढल्या जातात, त्या खात्यांचे संबंधांतील चेक्सवर विशेष नजर ठेवावी. जरूरीप्रमाणें, चेक्स वगैरे काढणारांकडे चौकशी करावी.

( ६ ) चालू खातें उघडतेवेळीं, बँकेनेंच खातेदारांना त्यांच्या खर्चानें परफोरेटिंग किंवा एम्बॉसिंग उपकरणें पुरवावीं; त्या उपकरणांच्या साह्यानें क्रॉसिंग करणें किंवा "अकाउंट पेई" लिहिणें खातेदारांना सोईचें होईल.

### "फिल्म इंडिया" मासिकाची कंपनी गुंडाळली जाणार

भारत सरकारच्या अर्जावरून, मुंबई हायकोर्टानें फिल्म इंडिया पब्लिकेशन्स ( प्रायव्हेट ) लि. गुंडाळण्यांत यावी असा हुकूम देऊन कोर्ट लिक्विडेटरची कंपनीच्या लिक्विडेटरपदीं नेमणूक केली. १९५३–५४ वर्षासाठी कंपनीनें ९९,००० रु. कर देणें होता, तो कंपनीनें भरला नाहीं. इनकमटॅक्स ट्रायब्यूनलनें कराची रक्कम पुढें ६६,००० रु. वर आणली. कंपनी देणीं भागविण्यास असमर्थ असून ती आर्थिक अडचणींत आहे, तेव्हां ती गुंडाळण्यांत यावी, असें भारत सरकारतर्फे अर्जांत म्हटलें होतें.

### मोठ्या शहरांजवळ नवे उद्योगधंदे नकोत


भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासंबंधीं सार्वजनिक चर्चा दुसरा कार्यक्रम संपण्याच्या आंतच चालू झाली आहे. तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम दुसऱ्यापेक्षाहि अधिक मोठा असण्याची शक्यता आहे. ह्या कार्यक्रमासंबंधीं श्री. श्रीमन् नारायण ह्यांनीं आपले विचार व्यक्त केले आहेत. नियोजन समितीचे ते एक सभासद आहेत. नियोजन समितीला धाडलेल्या आपल्या निवेदनांत ते म्हणतात कीं, देशाच्या ग्रामीण व नागरी भागांत जी आर्थिक तफावत दिसते ती भरून काढण्यांत आली पाहिजे. खेड्यांत नोकरीधंदा मिळण्याची अधिक शक्यता निर्माण करून आणि खेड्यांतील जीवनांत अधिक सुखसोयी निर्माण करून ही तफावत परिणामकारकतेनें भरून काढतां येईल. सध्यां अशी परिस्थिती आहे कीं, शहरांत कामधंदा मिळण्याची अधिक शक्यता असते. त्याचप्रमाणें शहरांतील जीवनहि अधिक सुखकारक असतें. त्यामुळें खेड्यांतील लोकांचा ओघ शहराकडे वहात आहे. ग्रामीण भागाला विजेच्या वांटपाच्या बाबतींत अधिक सवलती देणें अवश्य आहे. त्याचप्रमाणें ग्रामीण भागांत दळणवळणाचीं व वहातुकीचीं साधनेंहि वाढविण्यांत आलीं पाहिजेत. फ्रान्समध्यें पॅरीससारख्या मोठ्या शहरांच्या आसपास नवे उद्योगधंदे काढण्यास कायद्यानें बंदी करण्यांत आली आहे. त्यामुळें ग्रामीण भागांत उद्योगधंदे काढण्यास अप्रत्यक्ष मदत होत आहे. भारतांतहि अशा प्रकारची बंदी घालण्यासंबंधीं गंभीरपणें विचार करण्यांत आला पाहिजे. सध्यां मोठ्या प्रमाणावर चालणारे बहुसंख्य उद्योगधंदे मुंबई, कलकत्ता, मद्रास, दिल्ली आणि कानपूर अशांसारख्या मोठ्या शहरांच्या आसपास पसरलेले आहेत.

### व्याजापायीं दरसाल १५० कोटी रु.

भारत सरकार दरसाल १५० कोटी रुपये व्याजापायीं देत असतें. त्यामुळें राज्य सरकारांना बिनव्याजी कर्जें देणें मध्यवर्ती सरकारला ह्यापुढें परवडणार नाहीं, असें महसूलमंत्रि श्री. गोपाल रेड्डी ह्यांनीं लोकसभेंत सांगितलें.

### स्टेट बँकेचे नवे व्हाइस चेअरमन

स्टेट बँक ऑफ इंडिआच्या सेंट्रल बोर्डाच्या व्हाइस चेअरमनचे जागीं श्री. मंगळदास पकासा ह्यांची भारत सरकारनें दोन वर्षांचेसाठीं नेमणूक केली आहे. रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यानें व स्टेट बँकच्या सेंट्रल बोर्डाच्या शिफारसीवरून ही नेमणूक करण्यांत आली आहे.



( १ ) गुदामाचे उद्घाटन प्रसंगीं डॉ. शेख भाषण करीत आहेत. ( २ ) उपस्थित शेतकऱ्यांचा समुदाय.

## "व्यापाऱ्याला कर्ज" याचा अर्थ "व्यापाऱ्याला व्यापारी कामाकरितां कर्ज" असा होत नाहीं

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

चुनीलाल सोनमल आणि कंपनी ही एक सावकारी संस्था असून मुंबईच्या सावकारी कायद्याखालीं सावकारी करण्याचा तिला परवाना होता. तिच्यापासून बसतवार आईस फॅक्टरीनें प्रॉमिसरी नोटवर ५,००० रु. कर्ज काढलें. त्या कर्जाच्या वसुलीकरितां सावकारानें त्या फॅक्टरीविरुद्ध दावा आणला. प्रतिवादीनें मुंबई सावकारी कायद्याच्या कलम ३० खालीं हिशेबाकरितां अर्ज केला. असा अर्ज होऊं शकत नाहीं असा निकाल देऊन सिटी सिव्हिल जज्जानें तो अर्ज नामंजूर केला. या निकालाविरुद्ध प्रतिवादीनें हायकोर्टांत रिव्हिजन-अर्ज केला.

मुंबईच्या सावकारी कायद्याच्या कलम २ (९) खालीं "कर्ज" या शब्दाची व्याख्या दिलेली आहे. व्याजावर पैसे उसनें देणें याला कर्ज म्हणतात. परंतु यांत व्यापाऱ्याला दिलेल्या कर्जाचा समावेश होत नाहीं. "व्यापारी" या शब्दाची व्याख्या क. २ (१८) खालीं दिली आहे. त्या व्याख्येंत कारखान्याच्या मालकाचाहि समावेश करण्यांत आलेला आहे. प्रस्तुत मामल्यांतील अर्जदार हा कारखान्याचा मालक आहे याबद्दल वाद नाहीं. प्रस्तुत मामल्यांतील कर्ज व्यापाऱ्याला दिलेलें असल्यामुळें कलम २३ आणि २५ या कलमाच्या कामाकरितां खेरीज करून मुंबईच्या सावकारीच्या कायद्याचीं बाकीचीं कलमें त्या मामल्याला लागू होणार नाहींत आणि म्हणून व्यापाऱ्याला क. ३० खालील अर्ज करतां येणार नाहीं.

हायकोर्टांत अर्जदारातर्फे असा युक्तिवाद करण्यांत आला कीं, कर्ज जरी व्यापाऱ्याला दिलेलें असलें तरी तें कर्ज व्यापारी कामाकरितां दिलें नव्हतें असें अर्जदार शाबीत करूं शकतो. प्रस्तुत मामल्यांतील कर्ज व्यापारी कामाकरितां दिलें नव्हतें असें अर्जदाराचें म्हणणें होतें.

क. २ (९) (ग) मधील "व्यापाऱ्याला कर्ज" या शब्दांचा अर्थ "व्यापारी कामाकरितां व्यापाऱ्याला दिलेलें कर्ज" असा होतो किंवा काय हा एकच प्रश्न हायकोर्टापुढें होता. अर्जदारानें केलेल्या युक्तिवादाचा आशय असा होता कीं, "व्यापाऱ्याला कर्ज" या शब्दांचा अर्थ असा आहे कीं, व्यापाऱ्याला दिलेलें कर्ज व्यापारी कामाकरितां असलें पाहिजे. व्यापाऱ्याला दिलेलें कर्ज त्याच्या खाजगी कामाकरितां किंवा व्यापाराखेरीजकरून इतर कामाकरितां जर दिलेलें असेल तर मुंबईच्या सावकारी कायद्याखालीं त्या कर्जाला "व्यापाऱ्याला दिलेलें कर्ज" असें म्हणतां येणार नाहीं.

हा युक्तिवाद कोर्टानें मान्य केला नाहीं. क. २ (९) खालील एकंदर योजना लक्षांत घेतली असतां असें दिसून येईल कीं, कर्जाचा हेतु जेथें विचारांत घ्यावयाचा असेल तेथें कायद्यानें तो स्पष्टपणें दिलेला आहे. कर्जाचा हेतु जेथें महत्त्वाची बाब नसेल तेथें कायद्यानें तो दाखविलेला नाहीं.

याशिवाय दुसरी गोष्ट अशी आहे कीं, सावकारानें जर एखाद्या व्यापाऱ्याला कर्ज दिलें तर तें कर्ज व्यापाऱ्यानें कोणत्या कामाकरितां घेतलें आहे याची खात्री सावकारानें करून घेतली पाहिजे असें म्हणतां येणार नाहीं. असा अर्थ जर "व्यापाऱ्याला कर्ज" या शब्दांना लावला तर तो अनेक अडचणी निर्माण करील. तें ध्यानांत घेऊनच क. २ (९) (ग) खालीं सावकारानें जर व्यापाऱ्याला कर्ज दिलें असेल तर कायद्यानें सावकाराला संरक्षण दिलेलें आहे आणि त्या बाबतींत क. ३० लागू करण्यांत आलेलें नाहीं.

असा जर अर्थ लावण्यांत आला तर आपणावर भयंकर अन्याय होईल, कारण आपण क. ३० खालीं केलेला अर्ज ज्या कारणांकरितां होता त्यांपैकीं एक कारण असें होतें कीं, सावकारानें अव्वाच्या सव्वा व्याज आकारलें आहे हें आपणांस कोर्टाला दाखवून देतां यावें, असें अर्जदाराचें म्हणणें होतें. हें म्हणणेंहि हायकोर्टानें मान्य केलें नाहीं. कलम २३ आणि २५ हें व्यापाऱ्याला दिलेल्या कर्जाच्या बाबतींतसुद्धां लागू करण्यांत आलेलें आहे. म्हणून नोटिफिकेशनमध्यें ठरवून दिलेल्या जास्तींत जास्त व्याजाच्या दरापेक्षा सावकाराला जास्त व्याज क. २५ खालीं आकारतांच येणार नाहीं.

वरीलप्रमाणें निकाल देऊन हायकोर्टानें रिव्हिजन-अर्ज नामंजूर केला.

सारांश, मुंबईच्या सावकारीच्या कायद्याच्या क. २ (९) (ग) मध्यें "व्यापाऱ्याला दिलेलें कर्ज" असा जो शब्दप्रयोग आहे त्याचा अर्थ व्यापाऱ्याला दिलेलें कर्ज व्यापारी कामाकरितांच असलें पाहिजे असा होत नाहीं. व्यापाऱ्याला दिलेलें कर्ज जरी व्यापारी कामाकरितां नसलें तरी कर्ज वसुलीकरितां सावकारानें व्यापाऱ्याविरुद्ध आणलेल्या दाव्यांत व्यापाऱ्याला मुंबईच्या सावकारी कायद्याच्या क. ३० खालीं हिशेबाकरितां अर्ज करतां येणार नाहीं.

—न्यायबोध, फेब्रुवारी १९५९

**रशिआंतील कुटुंबनियोजन**— रशिआच्या मध्यवर्ती आंकडेविषयक संस्थेचे सभासद मि. मिनिऑकिन ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, रशिअन सरकार कुटुंबनियोजनाविषयीं धोरण असें आंखून देत नाहीं. मात्र प्रत्येक नागरिकाला आपल्या मर्जीप्रमाणें कुटुंबनियोजन करण्याची मुभा असते. सरकार मोठ्या कुटुंबांना खास भत्ता देतें. त्यामुळें अधिक संतति झाल्यास भत्ताहि साहजिकच वाढतो.

**वाळवंटी भागाविषयीं संशोधन-केंद्र** – वाळवंटी भागांतील जमिनविषयक प्रश्नांचें संशोधन करणारें एक केंद्र मध्यवर्ती सरकार राजस्थानमध्यें लवकरच स्थापन करणार आहे हें केंद्र मध्यवर्ती सरकार व संयुक्त राष्ट्र-संघटनेची शास्त्रीय उपसंघटना ह्यांच्यामार्फत कार्य करील राजस्थानांतील पसरत चाललेल्या वाळवंटाचाहि तें विचार करील.

**अहमदाबाद कॉर्पोरेशनचें अंदाजपत्रक**—अहमदाबाद कॉर्पोरेशननें आपलें १९५९-६० सालचें अंदाजपत्रक मंजूर केलें आहे. कॉर्पोरेशनचें उत्पन्न ३,५६,३२,६०० रु. धरण्यांत आलेलें असून खर्चाचा अंदाज ३,५६,१२,३०० रु. धरण्यांत आलेला आहे. कमिशनरनें केलेल्या करवाढीच्या सूचना स्टँडिंग कमिटीनें अमान्य केल्या. कोठलाहि नवा कर बसविण्यांत आला नाहीं.

**अंदमानमध्यें कॉफीची लागवड**—भारताची शेतकी-संशोधन संस्था अंदमानमध्यें कॉफीची लागवड करण्याचे प्रयत्न करीत आहे. ह्या कामासाठीं अंदमान बेटाची पहाणी करण्यास दोन तज्ज्ञांची पाठवणी गेल्या वर्षी करण्यांत आली होती. कॉफी बोर्डातर्फे हे तज्ज्ञ तिकडे गेले होते. त्यांनीं कॉफीच्या लागवडीची एक योजना सरकारला सादर केली आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.